# अमेरिकन डॉलरच्या नोटांचे बंडल व पुरातन वस्तु (अॅन्टीक पिस)दाखवुन नागरीकांना विश्वासात घेवुन भारतीय चलनांचे पैसै बदलुन रक्कम दुप्पट करण्याच्या बहाण्यांने फसवणुक करणारी आंतरराज्य टोळी तपास पथक ,खडकी पोलीस स्टेशन पुणे शहर पोलीसांकडुन जेरबंद

दि.३१/०७/२०१९ रोजी फिर्यादी श्री किशोर शांताराम गरुड वय २८ वर्षे धंदा ड्रायव्हर रा. पीएमसी कॉलनी शास्त्री नगर मारुती मंदीरामागे कोथरुड पुणे हे ईलायट हॉस्पीटल बाणेर येथे चहा पिण्यासाठी थांबले असतांना त्यांच्याशी ओळख निर्मान करुन एक २० चा अमेरीकन डॉलर दाखवुन त्यांचा मो.क्रं. घेवुन त्याना विश्वासात घेतले व दिनांक २२/०८/२०१९ रोजी ११/०० वाजताचे सुमारास खडकी बाजार येथे बोलावुन फिर्यादी यांना एका आरोपीने अमेरीकन डॉलर दाखविले व तसाच पुढे जात असतांना दुस-या आरोपी हा फिर्यादीस म्हणाला की, तो माझ्या मावशीचा मुलगा आहे तो वेडा त्याला थोडे अमिश दाखवावे लागेल म्हणुन फिर्यादीजवळील पैसै घेतले व वेडया इसमांच्या जवळ पैशाची बॅग दिली व वेडया इसमांजवळील अमेरीकन डॉलरची बॅग त्यांच्या हातात घेवुन हातचलाखीने त्या बॅगमधील अमेरीकन डॉलर काढुन घेवुन कागदी पुठठयांने रुमालामध्ये पॅक बांधलेली बॅग फिर्यादीच्या हातात देवुन आरोपी फरार झाल्याने खडकी पोलीस स्टेशन येथे गु.र.क्रं.२९४/२०१९ भादवि कलम ४२०, ३४ प्रमाणे दाखल असुन सदर गुन्हयांचा तपास पोलीस उपनिरीक्षक गिरी हे करीत आहेत.

सदरचा तपास सीसीटीव्ही, इतर तांत्रिक पुरावे, तसेच गुप्त बातमीदाराकडुन माहीती घेवुन करीत असतांना गुन्हा घडतेवेळी आरोपीचे सीसीटीव्ही वरुन प्राप्त झालेले फुटेजच्या आधारे आरोपीच्या वर्णनावरुन शोध घेत असतांना दि.२९/०८/२०१९ रोजी तपास पथकातील पो.हवा/३३०४ उत्तम कदम पो.कॉ/९८०६ संदीप गायकवाड यांना त्यांच्या बातमीदाराकरवी बातमी मिळाली की, अमेरीकन डॉलरचे आमिष दाखवुन फसवणुक करणारे इसम हे ग्राहकाला फसवण्याच्या उददेशांने डॉलर बाबत बोलणी करण्यासाठी खडकी बाजार येथील त्रिकोणी गार्डण ते अॅम्युनेशन फॅक्टरी रोडवर गार्डणच्य जवळ येणार असल्याची बातमी मिळाल्यांने सदर बातमी तपास पथकाचे प्रभारी अधिकारी प्रताप ल. गिरी यांना कळविल्यांने त्यांनी सदरबाबत वरिष्ठांना कळवुन लागलीच बातमीच्या ठिकाणी जावुन सापळा रचुन खात्री केली.सदर ठिकाणी बातमीप्रमाणे सांगितलेल्या वर्णनाचे तीन इसम व एक महीला आले असता त्यांना दि.२९/०८/२०१९ रोजी १५/२० वाजताचे सुमारास ताब्यात घेण्यात आली त्यांची नावे १) कबीर सलीम शेख वय २९ वर्षे रा. लक्ष्मीनगर,येरवडा पुणे मुळ पत्ता मु.सिमज हनुमान नगर जवळ, पो./ तहसिल जेसेंडी जि. देवघर राज्य झारखंड, २) मुस्तफा शहावली शेख वय ३१ वर्षे रा. लक्ष्मीनगर ,येरवडा मुळ पत्त बिस्मील्ला मस्जिद जवळ, मोहल्ला तहसिल लोणी ठाणा लोणी जि. गाझीयाबाद राज्य उत्तरप्रदेश ३) सलमान आलम शेख वय २६ वर्षे रा. लक्ष्मीनगर, येरवडा पुणे मुळ पत्ता ग्राम नस कॉलनी,पो.बुध्दनगर ठाणा बुध्द तहसिल लालबाग जि. गाझीयाबाद राज्य उत्तरप्रदेश ४) नसीमा बेगम मोहम्मद मुकीम वय ४८ वषे्र रा. लक्ष्मीनगर येरवडा पुणे मुळ गाव झाशी चौक सिटी, जि. मदारीपुर राज्य बिहार असे सांगितले लागलीच दोन पंचाना बोलावुन आरोपीची अंगझडती घेता त्यांच्या ताब्यात एक काळया रंगाची बॅग मिळुन आल्यांने त्यांची पाहणी करता बॅगमध्ये अमेरीकन चलन असलेली १ डॉलरची एक नोट व २० डॉलरच्या १४ नोटा , तसेच लाल रंगाच्या रुमालामध्ये बांधलेले वर्तमान पत्राच्या पेपरचा गठठा व त्यामध्ये एक रिन कंपनीचे साबन, तसेच ११ वेगवेगळया कंपनीचे मोबाईल, सिमकार्ड - ०९ वेगवेगळया कंपनीचे असे एकुण ४३८४०/- रुपये किमतीचे साहीत्य आरोपी यांचेकडे मिळुन आले आहेत.

तसेच तपासादरम्यांन आरोपीकडे तपास करता गुन्हा करतांना मिळालेले पैसै हे ते वेगवेगळया माध्यमांद्वारे लागलीच पाठवुन देतात त्यामुळे सदरची रक्कम ज्या खात्यामध्ये पाठविली ते खाते व आरोपीचे खाते असे सिल केले असुन त्यामध्ये २,१९,०००/-/ रुपये सिझ करुन ठेवले आहेत असा एकुण आरोपी यांचे २,६१,८७०/- रुपये कीमतीचे साहीत्य व रोख रक्कम मिळाली आहे. त्यामध्ये फसवणुक झालेले फिर्यादी यांना मा.न्यायालयाच्या आदेशान्वये त्यांची रक्कम त्यांना देण्याबाबत कारवाई करण्यात येणार आहे.दाखल गुन्हयांचा तपास करीत असतांना आरोपी यांचेकडुन खालीलप्रमाणे गुन्हे उघड झाले आहेत.

१) खडकी पोलीस स्टेशन गु.र.क्रं.२९४/२०१९ भादवि कलम ४२०,३४
२) खडकी पोलीस स्टेशन गु.र.क्रं. १४७/२०१९ भादवि कलम ४२०,३४
३) विश्रांतवाडी पोलीस स्टेशन गु.र.क्रं. २४७/२०१८ भादवि कलम ४२०,३४

Scanned by CamScanner

४) सहकारनगर पोलीस स्टेशन गु.र.क्रं. ३६४/२०१९ भादवि कलम ४२०,४०६,३४ तसेच येरवडा पोलीस स्टेशन गु.र.क्रं.३७/२०१८ भादवि कलम ४२०,३४ मधील पाहीजे आरोपी यांना अटक करण्यात आली आहे.यातील आरोपी यांचेकडुन तपासादरम्यांन ईतर आणखीन गुन्हे उघड होण्याची शक्यता आहे.

आरोपी यांची गुन्हे करण्याची पध्दत :-

यातील आरोपी हे लहान मोठे व्यापारी ,फळविक्रेते, भाजी विक्रेते, गाडीवरील चालक तसेच ईतर नागरीक यांचेकडुन एखांदी वस्तु खरेदी करतात व त्या वस्तुचे पैसै देतांना त्यांच्याकडे असलेली २० डॉलरची अमेरीकन नोट दाखवितात व अशा भरपुर प्रमाणात आमच्याकडे नोटा असुन त्यांची आम्हाला भारतीय चलनामध्ये बदली करावयाची आहे असे सांगतात . तेव्हा नागरीकांना दाखविलेली एक नोट ही त्यांना देतात व बँकेमध्ये जावुन खात्री करण्याबाबत सांगतात सदरची नोट खरी असल्यांने बँक अधिकारी सदरची नोट खरी असल्याचे सांगतात त्यावरुन फिर्यादी यांचा आरोपीवर विश्वास बसतो. त्यांनतर आरोपी हे माझ्या आईला विचारावे लागेल, पतिला विचारावे लागेल असे वेगवेगळे कारणे सांगुन दहा ते पंधरा दिवस त्यांच्या वेगवेगळया फोनद्वारे संपर्कात राहुन भारतीय चलनाचे पैसै जमा करण्यास सांगतात. त्यांनतर गर्दीच्या ठिकाणी मार्केट मध्ये म्हणजेच आरोपींना निघुन जाण्यासाठी दोन- तीन रस्ते असलेले ठिकाण निवडतात व त्या ठिकाणी येण्यास सांगतात व यातील ज्या आरोपींने फिर्यादी यांना संपर्क केला आहे ते दोन आरोपी समोर येतात व ईतर दोन आरोपी हे साईडला उभे राहुन लक्ष ठेवत असतात. त्यांपैकी एक जण वेडा असल्याचे सांगुन त्याची मनधरणी करावी लागेल असे भावनिक बनुवन फिर्यादीच्या पैशाची बॅग त्या वेडया आरोपीकडे देतात व वेडया आरोपीजवळील दाखविलेली डॉलरची बॅग फिर्यादी यांना देतात तेव्हा तो वेडयांचे नाटक करत असलेला आरोपी हातचलाखीने ते सर्व डॉलर काढुन घेतो व तशीच्या तशी बॅग फिर्यादीच्या हातात देतात. त्या बॅगमधील रुमालाला एवढया बारीक गाठी बांधलेल्या असतात की, फिर्यादी हे गाठी सोडुन डॉलर पाहण्यापर्यंत हे आरोपी त्या ठिकाणावरुन निघुन जातात. तरी नागरीकांनी अशा प्रकारचे इसम आपल्याला फसवण्यासाठी आल्यास पोलीसांना माहीती दयावी व अशा फसवणुकीपासुन सावध राहावे.

सदरचा गुन्हा उघडकीस येण्यासाठी महत्वाचा दुवा :-

दाखल गुन्हा हा ज्या ठिकाणी घडला होता त्या ठिकाणी थोडया अंतरावर सीसीटीव्ही लावलेले होते त्या सीसीटीच्या आधारे आम्हाला गुन्हे करणारे आरोपी यांचे फोटो मिळाले त्यावरुन तपास पथकातील कर्मचारी ते फोटो तील आरोपींचा गुप्त बातमीदाराकडुन शोध घेत असतांना पो.हवा.३३०४ उत्तम कदम व पो.शि/९८०६ संदीप गायकवाड यांना बातमी मिळाल्यांने आरोपी जाळयात आले आहे. तरी पुणे शहरातील सर्व व्यापारी व आस्थापना,सोसायटया यांना पुणे पोलीसांतर्फे आवाहन करण्यात येते की, आपण सीसीटीव्ही बसवावे जेणेकरुन एखांदा गुन्हा घडल्यास आरोपीपर्यंत पोहोचण्यासाठी तसेच आपली मालमत्ता व आपण सुरक्षित राहण्यास मदत होते.

सदरची कारवाई ही श्री सुनिल फुलारी,अपर पोलीस आयुक्त पुर्व प्रादेशिक विभाग, श्री प्रसाद अक्कानवरु, पोलीस उपआयुक्त,परिमंडळ-४, श्री लक्ष्मण बोराटे, सहा.पोलीस आयुक्त , खडकी विभाग, श्री भागवत मिसाळ वरिष्ठ पोलीस निरीक्षक,खडकी पोलीस स्टेशन,व शफिल पठाण पोलीस निरीक्षक (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली खडकी पोलीस स्टेशनचे तपास पथकाचे प्रभारी अधिकारी श्री प्रताप ल. गिरी पोलीस उपनिरीक्षक, सहा.पो.फौ.श्री गेंगजे, सहा.पो.फौ.श्री तापकीर, पो.हवा/३३०४ कदम,पो.हवा/१७३ ठोकळ, पोना/ ४९७० सावंत,पो.ना ९४७ पवार, पो.ना / ६८५० लोखंडे, पो.ना./३२७२ घुटे,पो.ना.६९५१ मेमाणे,पो.शि./९८०६ गायकवाड, पो.शि./ ८३२५ लोणकर, पो.शि/१२०१२ सोनवणे ,पो.शि/८८११ माने,पो शि /८१०८ नानापुरे यांनी केली असुन गुन्हयांचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक प्रताप ल. गिरी हे करीत आहेत.

तरी आपल्या लोकप्रिय माध्यमामध्ये/ दैंनिकांमध्ये प्रसिध्द होणेस विंनती आहे.

(भागवत मिसाळ)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
खडकी पोलीस स्टेशन,पुणे शहर

Scanned by CamScanner